राज्यातील गरजू महिलांना रोजगारासाठी "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

**महिला व बाल विकास विभाग.**

**शासन निर्णय क्रमांक- मवबा २०२४/प्र.क्र.२२/कार्या-२,**

नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, मादाम कामा रोड,

हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक:- ८ जुलै, २०२४.

**संदर्भ :-**

१) मा.उपमुख्यमंत्री तथा (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली दि.०७.१२.२०२३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

२) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचे पत्र क्र.मबाविआ/मवि/का-६/२०२३-२४/२७२, दि.१६.०१.२०२४.

३) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे दि.२७.०२.२०२४ रोजीचे अंतरिम अर्थसंकल्पीय अभिभाषण.

**प्रस्तावना :-**

मा.उपमुख्यमंत्री (वित्त), महाराष्ट्र राज्य यांनी सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात "पिंक ई-रिक्षा - १७ शहरांतल्या १० हजार महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य" उपलब्ध करुन देण्याची घोषणा केली आहे. त्यानुषंगाने राज्यातील महिला व मुलींना रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, सशक्तीकरणास चालना देण्यासाठी तसेच, महिला व मुली यांना सुरक्षित प्रवास करणे यासाठी नोकरी तसेच रोजगाराच्या जास्त संधी उपलब्ध असलेल्या शहरात इच्छुक महिलांना पिंक रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व चालविण्यासाठी इतर सोईसुविधा उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील महिला व मुलींना रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, सशक्तीकरणास चालना देण्यासाठी तसेच, महिला व मुली यांना सुरक्षित प्रवास करणे यासाठी नोकरी तसेच रोजगाराच्या जास्त संधी उपलब्ध असलेल्या मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, कल्याण, अहमदनगर, नवी मुंबई, पिंपरी, अमरावती, चिंचवड, पनवेल, छत्रपती संभाजीनगर, डोंबिवली, वसई-विरार, कोल्हापूर व सोलापूर या शहरात इच्छुक महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व चालविण्यासाठी इतर सोईसुविधा उपलब्ध

करून देण्यासाठी राज्यातील गरजु महिलांना रोजगारासाठी "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" ही योजना राज्यात लागू करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर योजनेंतर्गत राज्यातील प्रमुख शहरांमध्ये गरजु महिलांना रोजगारासाठी "पिंक (गुलाबी) रिक्षा" उपलब्ध करुन देण्यासाठी खालीलप्रमाणे १०,००० लाभार्थ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे.

| अ.क्र. | शहर | लाभार्थी |
|---|---|---|
| १ | मुंबई उपनगर | १४०० |
| २ | ठाणे | १००० |
| ३ | पुणे | १४०० |
| ४ | नाशिक | ७०० |
| ५ | नागपुर | १४०० |
| ६ | कल्याण | ४०० |
| ७ | अहमदनगर | ४०० |
| ८ | नवी मुंबई | ५०० |
| ९ | पिंपरी | ३०० |
| १० | अमरावती | ३०० |
| ११ | चिंचवड | ३०० |
| १२ | पनवेल | ३०० |
| १३ | छत्रपती संभाजीनगर | ४०० |
| १४ | डोंबिवली | ४०० |
| १५ | वसई-विरार | ४०० |
| १६ | कोल्हापुर | २०० |
| १७ | सोलापुर | २०० |
| | एकुण | १०,००० |

३. **<u>योजनेचा उद्देश:-</u>**

१) राज्यातील महिला व मुलींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे.
२) त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे.
३) राज्यातील होतकरू मुली व महिला स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे.
४) राज्यातील महिला व मुली यांना सुरक्षित प्रवास करता यावा.
५) राज्यातील महिलांना व मुलींना सशक्तीकरणास चालना मिळणे.

४. <u>योजनेचे स्वरुप:-</u>

सदर योजनेंतर्गत गरजू महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी खालीलप्रमाणे **अर्थसहाय्य व चालविण्यासाठी इतर सोईसुविधा** उपलब्ध करून देण्यात येत आहे.

१) ई-रिक्षाची किंमतीमध्ये सर्व करांच्या (GST, Registration, Road Tax, etc.) समावेश असेल.

२) नागरी सहकारी बँका/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका/राष्ट्रीयकृत बँका/ अनुज्ञेय असलेल्या खाजगी बँकाकडून ई-रिक्षा किंमतीच्या ७० टक्के कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल.

३) राज्य शासन २० टक्के आर्थिक भार उचलेल.

४) योजनेची लाभार्थी महिला/मुलीं यांच्यावर १० टक्के आर्थिकभार असेल.

५) कर्जाची परतफेड ५ वर्षे (६० महिने)

५. <u>योजनेचे लाभार्थी:-</u>

राज्यातील गरजू मुली व महिला.

६. <u>योजनेच्या लाभार्थ्याची पात्रता:-</u>

१) लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक राहील.

२) अर्जदाराचे वय १८ ते ३५ वर्षे दरम्यान असणे अनिवार्य आहे.

३) सदर योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे.

४) लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.३.०० लाखापेक्षा जास्त नसावे.

५) लाभार्थ्यांकडे वाहन चालक परवाना असणे आवश्यक राहील.

६) विधवा, कायद्याने घटस्फोटीत, राज्यगृहामधील इच्छुक प्रवेशित, अनाथ प्रमाणपत्र प्राप्त युवती, अनुरक्षणगृह/बालगृहातील आजी/माजी प्रवेशित यांना प्राधान्य देण्यात येईल.

७) तसेच दारिद्र्य रेषेखालील महिलांना सुध्दा प्राधान्य देण्यात येईल.

७. <u>सदर योजनेमध्ये लाभ मिळण्याकरिता खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत:-</u>

१) योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज.

२) लाभार्थ्याचे आधार कार्ड व पॅन कार्ड.

३) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र.

४) कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रु.३.०० लाखापेक्षा कमी.).

५) बँक खाते पासबुक.

६) पासपोर्ट आकाराचा फोटो.

७) मतदार ओळखपत्र (१८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर मतदार यादीत नाव असल्याचा दाखला).

८) रेशनकार्ड.

९) चालक परवाना (Driving License).

१०) सदर रिक्षा ही लाभार्थी महिलाच चालविणार असल्याचे हमीपत्र.

११) सदर योजनेच्या अटीशर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

## ८. लाभार्थी निवड :-

सदर योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| २) | परिवहन विभाग अधिकारी/प्रतिनिधी | - सदस्य |
| ३) | उद्योग, उर्जा व कामगार विभाग अधिकारी /प्रतिनिधी | - सदस्य |
| ४) | महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा समन्वयक | - सदस्य |
| ५) | नागरी बाल विकास प्रकल्प अधिकारी | - सदस्य |
| ६) | संबंधित जिल्हा महिला बाल विकास अधिकारी | - सदस्य सचिव |

प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी करताना प्रत्येक शहरासाठी निश्चित करण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येपेक्षा पात्र असलेल्या लाभार्थ्यांचे अर्ज मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्यास, प्राध्यान्य दिलेल्या लाभार्थ्यांमधून पारदर्शी **"लॉटरी"** पध्दतीचा अवलंब करुन योजनेच्या लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

## ९. नियंत्रण अधिकारी :-

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सदर योजनेसाठी नियंत्रण अधिकारी राहतील. सदर योजनेची जाहिरात राज्यातील वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन इच्छुक लाभार्थ्यांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात आवश्यक ती कार्यवाही आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

## १०. पिंक ई-रिक्षाचे Specifications :-

| Sr. No. | Component | Specifications |
|---|---|---|
| १ | Price (Including all Tax॰s) | कमाल रु.४.०० लाख |
| २ | Motor Capacity | १० एचपी |
| ३ | Milage/Charge | किमान ११० कि.मी. |
| ४ | Seater | ३+१ (Driver) |

या शिवाय परिवहन विभागाने कायद्याने नेमून दिलेले Specifications असावेत. तसेच सदर ई-रिक्षा नामांकित कंपनीची असावी.

११. <u>पिंक ई रिक्षा खरेदीची कार्यप्रणाली:-</u>

शासनाच्या प्रचलित धोरणास अनुसरुन विहित कार्यपध्दतीचा वापर करुन एजन्सी/कंपनीची निवड आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

निवड झालेल्या एजन्सी/कंपनीमार्फत योजनेतील नमूद शहरातील पात्र लाभार्थ्यांना ई रिक्षा पुरविल्या जातील.

१२. <u>योजनेची कार्यपध्दती :-</u>

१) इच्छुक महिला पिंक ई-रिक्षासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयाला अर्ज करतील.

२) प्राप्त अर्जांची अंतिम छाननी करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीची राहिल.

३) पात्र अर्जदारांना रिक्षा खरेदी करण्यासाठी शासनाने निश्चीत केलेल्या कर्ज देणाऱ्या बँकांची व वाहन पुरवठा करणाऱ्या एजन्सीची माहिती देण्यात येईल.

४) अंतिम मंजूरीनंतर अर्जदार शासनास निश्चीत केलेल्या वाहन पुरवठा एजन्सीला मान्य असणाऱ्या बँकेत रिक्षा खरेदीसाठी ७०% कर्ज मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन कर्ज मंजूर करून घेईल.

५) बँकेकडून घेतलेल्या ७०% कर्जाची रक्कम फेडण्याची जबाबदारी अर्जदाराची राहिल.

६) बँकेने अर्जदारास रिक्षाच्या किमतीच्या ७०% कर्ज मंजूर केल्यानंतर अर्जदार ज्या वाहन एजन्सीकडून रिक्षा खरेदी करणार आहे त्या एजन्सीला १०% रक्कम भरेल.

७) अर्जदारास परमिट मिळाल्यानंतर शासनामार्फत देय असणारी २०% रक्कम संबंधीत वाहन एजन्सीला जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत देण्यात येईल.

८) रिक्षा खरेदीची संपूर्ण किंमत संबंधीत वाहन एजन्सीकडे जमा केल्यानंतर वाहन अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात येईल.

९) पिंक रिक्षा लाभार्थी महिलेकडूनच चालविली जात आहे, याबाबतची तपासणी करण्याची जबाबदारी वाहतुक नियंत्रक पोलीस विभाग आणि परिवहन विभागाची राहिल. तसेच सदर पिंक रिक्षा पुरुष चालवित असतांना आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

१०) लाभार्थी महिलेस पिंक रिक्षा मिळाल्यानंतर सदर रिक्षा महिलेने चालवून अर्थार्जन करणे व स्वावलंबी होणे अपेक्षित आहे.

११) सदर योजनेची अंमलबजावणी नियमानुसार होते किंवा नाही हे तपासण्याची जबाबदारी याची जबाबदारी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी या कार्यालयाची राहिल.

१२) या योजनेच्या लाभार्थी महिलेने ई-रिक्षा घेवून न चालविणे, तसेच कर्जाची रक्कम परतफेड न करणे अशा प्रकारच्या बाबी निर्देशनास आल्यास संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा महिला बाल विकास अधिकारी सदर लाभार्थी महिलेच्या अडीअडचणी लक्षात घेवून त्यांचे समुपदेशन करुन समस्याचे निराकरण करतील. तद्नंतरही अशा प्रकरणात समस्या कायम राहिल्यास जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांच्याकडून बॅकेशी चर्चा करुन नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

१३) सदर योजनेची अंमलबजावणी सुकर व्हावी यासाठी कार्यपध्दतीमध्ये बदल करण्याचे अधिकार मा.मंत्री, महिला व बाल विकास यांना राहतील.

१३. **योजनेच्या अटी व शर्ती:-**

१) सदर योनजेंतर्गत लाभार्थी महिलेला एकदाच लाभ घेता येईल.

२) सदर लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ई-रिक्षा योजनेचा लाभ घेतला नसावा.

३) सदर लाभार्थी महिला कर्जबाजारी नसावी.

४) कर्ज फेडीची संपूर्ण जबाबदारी लाभार्थी महिलेची राहील.

१४. सदर शासन निर्णय दि.०५.०७.२०२४ रोजीच्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१५. सदर योजनेसाठीच्या आर्थिक तरतूदीबाबतचे आदेश वेगळ्याने निर्गमित करण्यात येतील.

१६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०७०८१४३९२६२८३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANUP KUMAR YADAV

Digitally signed by ANUP KUMAR YADAV
Date: 2024.07.08 18:17:39 +05'30'

(डॉ. अनुप कुमार यादव)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.